# अहवाल

श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" अंतर्गत विविध कार्यक्रम संपन्न स्थानिक:- महाराष्ट्र शासन यांच्या परिपत्रकानुसार वाचन संस्कृतीच्या विकासाने तरुणांचा व्यक्तिमत्वचे भरणपोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. परंतु अलीकडच्या काळात देशाचे तरुण वाचन संस्कृतीपासून दुरावत चाललेल्या आढळुन येतात त्यामुळे तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने श्री शिवाजी शारिरीक शिक्षण महाविद्यालयात ग्रंथालय विभागाद्वारे विद्यार्थीसाठी दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी पासून "वाचन संकल्प महाराष्ट्रचां" या संकल्पनेतून वाचन पंधरवडा या कार्यक्रम अंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित केले गेले आहे त्या निमित्य श्री शिवाजी शारिरीक शिक्षण महाविद्यालयामधील ग्रंथालय विभागातर्फे “वाचन कौशल्य विकास” वर कार्यशाळेचे आयोजन आज करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सन्मानीय प्राचार्य डॉ. प्रेमसिंग सायर प्रमुख अथिती म्हणून लाभलेले सन्मानीय डॉ संजय खडसे सोबत महाविद्यालयमधील जेष्ठ प्राध्यापक डॉ. उल्हास सर, डॉ. पुष्पलता देशमुख मैडम, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सन्मानीय मान्यवरांनी कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा व डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला हार अर्पण आणि दीप प्रज्वलन केले व लगेच मान्यवराचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विनोद मसराम यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात आजच्या या टेक्नॉलॉजीच्या जगात कुठेतरी वाचन संस्कृती हरविली आहे. आज जिकडे तिकडे पहावे तर प्रत्येक व्यक्ती हा मोबाईल चा आहारी गेलेला आपल्या दिसून येतो फेसबुक इंस्टाग्राम व टेलिग्राम सारख्या सोशल मीडियावर भरभरून अशी माहिती एक मिनिटात प्राप्त होते पण ती माहिती फार काळ टिकून राहत नाही, सुरुवातीला पुस्तकी ज्ञान हे अविस्मरणीय राहायची पण सध्या चा काळात् हे कुठे तरी दुर्लक्षित होताना आपल्याला पाहायला दिसत आहे

यानंतर प्रमुख अथिती म्हणून लाभलेले डॉ. संजय खडसे यांनी आपल्या मार्गदर्शन भाषणात पुस्तक हा तुमचा मित्र आहे गुरु आहे एक आत्मा आहे पुस्तक हे अफाट समुद्र सारखा ज्ञान आपल्याला देत राहतो म्हणून मी सर्वांना आव्हान करेल की पुस्तकातील ज्ञान हा टेक्नॉलॉजी पेक्ष्या खूप श्रेष्ठ आहे म्हणून मला एक लेखकाची ओळ आठवत आहे त्यात त्यांनी म्हटल होत “एक वाचक मरण्यापूर्वी हजारो आयुष्य जगतो, जो माणूस कधीही वाचत नाही तो फक्त एकच माणूस म्हणून जगतो” . यानंतर कार्याक्रमचे अध्यक्ष सन्मानीय प्राचार्य डॉ प्रेमसिंग सायर यांनी आपल्या भाषणात सागीतले की महाराष्ट्र शासन यांच्या परिपत्रकानुसार दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी पासून "वाचन संकल्प महाराष्ट्रचां" या संकल्पनेतून ग्रंथालय विभाग व्दारे वाचन पंधरवडा या कार्यक्रम अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन आमच्या महाविद्यालय मध्ये करण्यात आलेले त्याचाच एक भाग म्हणजे आमच्या ग्रंथालयात दिनांक ०६/०१/२०२५ पासून ग्रंथ-प्रदर्शनी चे आयोजन करण्यात असून डॉ. खडसे यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करन्यात आले आहे तरी सर्व पालक वर्ग, विधार्थी, शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी वृदानि याचा आस्वाद नक्की घ्यावा तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. संजय खडसे यांनी आपल्याला “वाचन कौशल्य विकास” यावरती जे

मार्गदर्शन केले त्याला आपल्या जीवनामध्ये आत्मसाद करावे तसेच ग्रंथालय मध्ये सामूहिक वाचन हा कार्यक्रम आयोजित केले गेले आहे त्यात विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे संचालन डॉ. विनोद मसराम व आभार प्रदर्शन  डॉ जितेंद्र राऊत यांनी केले कार्यक्रमचा शेवट हा राष्ट्रगान म्हाणून संपन्न झाला. या प्रसंगी  महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेले ग्रंथालय विभागातील सहाय्यक ग्रंथपाल डॉ. विनोद मसराम व सौ स्वाती न्याहाटकर   यांनी अथक परिश्रम घेतले.
प्रती, मा.  *संपादक दैनिक.

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध करावी ही विनंती.

धन्यवाद..!

